# —:प्रेस नोट:—

## इमारत शाखा पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली येथील वरिष्ठ श्रेणी लिपीक यांचेवर अॅन्टी करप्शन ब्युरोची कारवाई

इमारत शाखा, पोलीस कार्यालय गडचिरोली जिल्हा गडचिरोली येथील वरिष्ठ श्रेणी लीपीक श्री विक्की भाष्कर प्रधान, वय ३० वर्षे, (वर्ग—३) यांना लाच रक्कमेची मागणी करीता अॅन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोलीच्या पथकाने आज दिनांक १२/११/२०२४ रोजी २०:०० चे दरम्यान पकडले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, घटना तारीख वेळी व ठिकाणी यातील तक्रारदार यांना गडचिरोली पोलीस विभागातील संपुर्ण जिल्हयाचे पोलीस स्टेशन, उप पोलीस स्टेशन, पोलीस वसाहत, मुख्यालय, एसआरपीएफ व सिआरपीएफ येथील सेप्टीक टॅक सफाईचे मंजूर टेंडरचे बिल तयार करून दिल्याबददल कामाचा मोबदला म्हणून गै. अ. विक्की भाष्कर प्रधान, वरिष्ठ श्रेणी लिपीक, नेमणुक इमारत शाखा, पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली यांनी लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून १,५०,०००/—रू. लाचेची मागणी करून त्यापैकी ५०,००० रुपये स्वत:च्या लग्नावेळी तसेच काही दिवसांपुर्वी ४,००० रुपये स्विकारल्याचे कबुल करुन लाच मागणी पडताळणी दरम्यान उर्वरीत ९६,००० रुपये लाच मागणी रक्कमेपैकी पहिला हप्ता १०,०००/—रू. लाच आणुन देण्याची मागणी करुन उर्वरीत ८६,००० रुपये नंतर व्यवस्था करून आणुन देण्याची लाच रक्कमेची पंचसाक्षीदारा समक्ष सुस्पष्ट मागणी केल्याने आरोपीला पोस्टे गडचिरोली येथे अप क्रं.८७९/२०२४ अन्वयें, कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८(संशोधन २०१८,) अन्वयें गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस उप अधीक्षक श्री. चंद्रशेखर ढोले, ला.प्र.वि. गडचिरोली यांचे पर्यवेक्षणात पो.नि. संतोष पाटिल यांनी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची अत्यंत गोपनीयरित्या शहानिशा करून सापळा कारवाईचे आयोजन केले. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक डॉ. श्री. दिगंबर प्रधान, अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर, श्री. सचिन कदम अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर, मा. श्री. संजय पुरंदरे अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपुर यांचे मार्गदर्शनात व पोलीस उप अधीक्षक श्री. चंद्रशेखर ढोले, ला.प्र.वि. गडचिरोली यांचे पर्यवेक्षणात पोलीस निरीक्षक श्री. संतोष पाटिल, सफौ. सुनिल पेद्दीवार, पोहवा/ शंकर डांगे, पोहवा/राजेश पदमगिरीवार, पोहवा/किशोर जौंजारकर, नापोशि स्वप्नील बांबोळे, पो.अं. संदीप उडान, संदिप घोरमोडे, प्रविण जुमनाके, मपोशि/ज्योत्सना वसाके, विद्या म्हशाखेत्री व चापोहवा राजेश्वर कुमरे, सर्व नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली यांनी केलेली आहे.

गडचिरोली जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजेंट) कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास, तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोली यांचेशी सपंर्क साधावे असे आवाहन पोलीस उप अधीक्षक श्री. चंद्रशेखर ढोले यांनी केले आहे.

१२।११।२४

( चंद्रशेखर ढोले )
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली

**पोलीस अधीक्षक मा. डॉ. श्री. दिगंबर प्रधान, ला.प्र.वि. नागपूर,**
**अपर पोलीस अधीक्षक, मा. श्री. सचिन कदम ला.प्र.वि. नागपूर,**
**अपर पोलीस अधिक्षक, मा. श्री. संजय पुरंदरे ला.प्र.वि. नागपुर**
**पोलीस उप अधीक्षक, श्री. चंद्रशेखर ढोले लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, गडचिरोली.**
**मो. नं. ९९२३३३२७५५ दुरध्वनी क्रमांक — ०७१२—२९५०२०**
**टोल फ्रि क्रमांक — १०६४**